सत्यमेव जयते


# निवडणूक वार्ता


## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

जानेवारी २०१६












## राज्यातील विभागनिहाय स्थानिक स्वराज्य संस्थांची संख्या (लोकसंख्या २०११)

| अ. क्र. | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| विभाग | कोकण | नाशिक | पुणे | औरंगाबाद | अमरावती | नागपूर | **एकूण** |
| क्षेत्रफळ चौ.किमी. | ३०७२८ | ५७४९३ | ५७२७५ | ६४८१३ | ४६०२७ | ५१३७७ | **३०७७१३** |
| लोकसंख्या | २८६०१४४१ | १८५७९४२० | २३४४९०४९ | १८७३१८७२ | ११२५८११७ | ११७५४४३४ | **११२३७४३३३** |
| जिल्ह्यांची संख्या | ७ | ५ | ५ | ८ | ५ | ६ | **३६** |
| महानगर-पालिका | ८ | ५ | ५ | ४ | २ | २ | **२६** |
| नगर-परिषदा | २३ | ४० | ४४ | ५० | ४० | ३३ | **२३०** |
| नगर-पंचायती | १७ | १५ | ५ | २४ | १५ | ३४ | **११०** |
| जिल्हा परिषदा | ५ | ५ | ५ | ८ | ५ | ६ | **३४** |
| पंचायत समित्या | ४५ | ५४ | ५७ | ७६ | ५६ | ६३ | **३५१** |
| ग्राम-पंचायती | २९४४ | ४८९७ | ५६६२ | ६६४७ | ३९५१ | ३६८० | **२७७८१** |
| एकूण | ३०४२ | ५०१६ | ५७७८ | ६८०९ | ४०६९ | ३८१८ | **२८५३२** |



**CH. Vidyasagar Rao**
GOVERNOR OF MAHARASHTRA



सत्यमेव जयते

**RAJ BHAVAN**
**Malbar Hill**
**Mumbai 400 035**
Tel : 022-2363 2660
Fax : 022-2368 0505

०३ डिसेंबर २०१५

# शुभ संदेश

राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने 'निवडणूक वार्ता'चा प्रथम अंक प्रकाशित करण्यात येत असल्याचे समजून आनंद झाला.

भारतीय राज्य घटनेतील ७३ वी आणि ७४ वी घटना दुरुस्ती म्हणजे लोकशाहीचा पाया बळकट करण्याच्यादृष्टीने क्रांतिकारक पाऊल ठरले. स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक स्वायत्तता मिळाली आणि त्यांच्या निवडणुका वेळेवर; तसेच मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणात घेण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली. राज्य निवडणूक आयोगाचा दर्जा, शक्ती व अधिकार भारत निवडणूक आयोगाप्रमाणेच आहेत, असे सर्वोच्च न्यायालयानेही एका प्रकरणाच्या निकालात अधोरेखित केले आहे.

राज्य निवडणूक आयोगाने गेल्या वर्षभरात निवडणूक सुधारणांच्याबाबतीत केलेल्या उपाययोजना कौतुकास्पद आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत वारंवार विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांच्या पुस्तकांचे (FAQ) अलीकडे प्रकाशन झाले होते. त्यातून आयोगाने अत्यंत सुलभ आणि सोप्या भाषेत माहिती उपलब्ध करून दिली आहे.

देशाची वाटचाल 'डिजीटल इंडिया'कडे होत असताना राज्य निवडणूक आयोगानेही निवडणूक प्रक्रियेचे संगणकीकरण करण्याच्या दिशेने टाकलेली पावले पारदर्शकता आणि गतिमानतेला बळ देणारी आहेत. एफ.ए.क्यू. (वारंवार विचारले जाणारे प्रश्न) पुस्तकांप्रमाणेच 'निवडणूक वार्ता' या नव्या अंकाचेही उत्स्फूर्त स्वागत होईल, असा मला विश्वास आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या 'निवडणूक वार्ता'च्या प्रकाशनास माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा!

**(चे. विद्यासागर राव)**
महाराष्ट्राचे राज्यपाल

## संपादकीय मंडळ

मार्गदर्शक
**श्री. ज. स. सहारिया**
राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र

मुख्य संपादक
**डॉ. प्रदीप व्यास**
सचिव, राज्य निवडणूक आयोग

संपादक मंडळ सदस्य
**श्री. प्र. बा. दांडेकर**, उपसचिव
**श्री. ध. मा. कानेड**, उपसचिव
**श्री. नि. ज. वागळे**, अवर सचिव
**श्री. अविनाश सणस**, सहायक आयुक्त
**श्री. के. सूर्यकृष्णमूर्ती**, सहायक आयुक्त
**श्रीमती दीप्ती पाटील**, उपमुख्य कार्यकारी अधिकारी
**श्रीमती आरती सरवदे**, तहसीलदार
**श्रीमती मनीषा मोहिते**, तहसीलदार
**श्री. अतुल जाधव**, कक्ष अधिकारी
**श्री. संजय हेंद्रे**, कक्ष अधिकारी
**श्रीमती राजेश्वरी देशपांडे**, लेखा अधिकारी
**श्रीमती मनीषा माने**, सांख्यिकी अधिकारी

कार्यकारी संपादक
**श्री. जगदीश मोरे**,
माहिती व जनसंपर्क अधिकारी


## अनुक्रमणिका


- प्रारंभीचा संवाद / ५
- राज्य निवडणूक आयोग / ६
- आयोगाचे अधिकार, दर्जा व शक्ती / ७
- राज्य निवडणूक आयुक्त / ८
- स्थानिक स्वराज्य संस्था / ९
- निवडणूक रणधुमाळी– २०१५ / १०
- वाटचाल आधुनिक तंत्रज्ञानाकडे / १२
- तुमच्या प्रश्नाला क्षणात उत्तर / १३
- सुसज्ज, प्रसन्न कार्यालय / १४
- ...तर पक्ष नोंदणी रद्द / १५
- मतदार व्हा, मतदान करा! / १६
- सेतू सुसंवादाचा / १८


✲ या अंकातील माहिती ३१ डिसेंबर २०१५ अखेरपर्यंतची आहे.

प्रकाशक : राज्य निवडणूक आयोग, पहिला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई– ३२.



**नमस्कार,**

महानगरपालिका, नगरपरिषदा/ नगरपंचायती, जिल्हा परिषदा/ पंचायत समित्या, ग्रामपंचायती या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची घटनात्मक जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका म्हणजे लोकशाही व्यवस्थेचा पाया आहे. हा पाया मजबूत करण्यासाठी ७३ व्या आणि ७४ व्या घटना दुरुस्तीनंतर सर्व राज्यांत स्वतंत्र राज्य निवडणूक आयोगांची स्थापना करण्यात आली. या घटना दुरुस्तीला २०१७ मध्ये २५ वर्षे पूर्ण होत आहेत. या ऐतिहासिक घटनेच्या रौप्यमहोत्सवाच्या उंबरठ्यावर असताना 'निवडणूक वार्ता' हा आणखी एक उपक्रम आम्ही हाती घेतला आहे. हा अंक प्रकाशित करताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकांची जबाबदारी भारत निवडणूक आयोगावर आहे. या निवडणुका दर पाच वर्षांनी होतात. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाही पाच वर्षांनीच होतात; परंतु त्यांच्या मुदती वेगवेगळ्या वेळी संपत असतात. परिणामी, सातत्याने निवडणुका सुरू असतात. लोकसभा, विधानसभा मतदारसंघाची पुनर्रचना दर ३० वर्षांनी होते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारसंघांची म्हणजे प्रभागांची रचना मात्र प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी करावी लागते आणि चक्रानुक्रमे आरक्षणाची सोडतही काढावी लागते. थोडक्यात राज्य निवडणूक आयोगाच्या पातळीवर सतत कुठली तरी निवडणूक प्रक्रिया सुरू असते. विविध घडामोडी घडत असतात. या सर्व निवडणुका, त्या संदर्भातल्या घटना, घडामोडींची माहिती निवडणूक प्रक्रियेशी संबंधित सर्व अधिकारी, कर्मचारी, राजकीय पक्ष, मतदार आणि अभ्यासकांना व्हावी, हेच 'निवडणूक वार्ता'चे प्रयोजन आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या आजपर्यंतच्या वाटचालीत या पूर्वीच्या चार राज्य निवडणूक आयुक्तांचेही मोठे योगदान आहे. प्रत्येक आयुक्तांनी आपापल्या काळात आवश्यक त्या सुधारणा केल्या आहेत. काही नवीन उपक्रमही राबविले आहेत. मुक्त, निर्भय आणि पारदर्शक वातावरणात निवडणुका पार पाडण्यासाठी राज्य शासन आणि पोलिस यंत्रणेचेही वेळोवेळी सहकार्य लाभले आहे. विविध राजकीय पक्ष आणि क्षेत्रीय स्तरावरच्या अधिकाऱ्यांचे सहकार्यही मोलाचे ठरते. या सर्वांचे आम्ही आभारी आहोत.

'निवडणूक वार्ता' हा पहिलाच प्रयत्न आहे. त्यात साधारणत: गेल्या वर्षभरातील घटना, घडमोडी आणि उपक्रमांची माहिती संक्षिप्त स्वरुपात दिली आहे. संगणक प्रणालीच्या माध्यमातून प्रभाग रचना, नामनिर्देशनपत्रांची माहिती संकेतस्थळावर भरणे, निरीक्षकांची नियुक्ती आदींचा त्यात समावेश आहे. यातील काही उपक्रम प्रायोगिक स्वरुपात असले तरी भविष्याच्या दृष्टीने त्यांच्याशिवाय पर्याय नाही. त्यांच्या प्रगतीबाबत आम्ही आपल्याला 'निवडणूक वार्ता'च्या माध्यमातून वेळोवेळी अवगत करूच. या अंकाचे आपण स्वागत कराल, असा मला विश्वास आहे.

**धन्यवाद!**

आपला

**ज. स. सहारिया**

राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र

# राज्य निवडणूक आयोग

- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी १९९२ मध्ये ७३ वी आणि ७४ वी घटना दुरुस्ती करण्यात आली. स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक स्वायत्तता आणि अधिकार प्रदान करण्यात आले. त्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुदतीत घेण्यासाठी प्रत्येक राज्यात राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्याची तरतूदही करण्यात आली. त्या अनुषंगाने राज्य घटनेच्या अनुच्छेद २४३के आणि २४३झेडए अन्वये २६ एप्रिल १९९४ रोजी महाराष्ट्रात 'राज्य निवडणूक आयोगा'ची स्थापना करण्यात आली आहे.
- महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींच्या निवडणुका घेण्याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आली आहे.
- राज्य निवडणूक आयोगाच्या इतिहासात काही महत्वाच्या घटना नोंदविल्या गेल्या आहेत. त्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी विधानसभेच्या मतदार यादीचा वापर, इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीनचा वापर, क्रांतिज्योती प्रकल्प, नोटाची (NOTA) सुविधा आदींचा समावेश आहे. तत्कालीन निवडणूक आयुक्तांच्या नेतृत्वाखाली या सुधारणा करण्यात आल्या आहेत. निवडणूक सुधारणांना आता आणखी गती देण्याचा प्रयत्न सुरू आहे.

## मागे वळून पाहताना

| | |
|---|---|
| २६ एप्रिल १९९४ | : राज्य निवडणूक आयोगाची स्थापना |
| २९ जानेवारी १९९६ | : विधानसभेच्या मतदार यादीचा वापर |
| २९ मार्च २००४ | : इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीनद्वारे मतदान |
| २० नोव्हेंबर २००४ | : राजकीय पक्षांच्या नोंदणीस सुरवात |
| ८ जानेवारी २०१० | : क्रांतिज्योती प्रकल्पाचा प्रारंभ |
| २७ मार्च २०१० | : शाईऐवजी मार्कर पेनचा वापर |
| १२ नोव्हेंबर २०१३ | : मतदारांसाठी नोटाची (NOTA) सुविधा |
| २३ डिसेंबर २०१४ | : नामनिर्देशनपत्रे भरण्यासाठी संकेतस्थळ |
| २ फेब्रुवारी २०१५ | : संगणक प्रणालीद्वारे प्रभाग रचनेचा प्रयोग |
| ४ जून २०१५ | : कागदपत्रांची पूर्तता न करणाऱ्या नोंदणीकृत पक्षांना नोटिसा |

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

# आयोगाचा अधिकार, दर्जा व शक्ती

- स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांची प्रक्रियादेखील थोड्याफार फरकाने लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणेच असते. म्हणूनच राज्य निवडणूक आयोगालाही भारत निवडणूक आयोगाप्रमाणे समान अधिकार आहेत.
- सर्वोच्च न्यायालयाने मोहिंदरसिंग गील विरुद्ध मुख्य निवडणूक आयुक्त या प्रकरणातही महत्वपूर्ण निकाल दिला आहे. त्यात निवडणूक आयोगाला आवश्यक तेथे प्रशासकीय, कायेदविषयक आणि न्यायिक स्वरूपाचे अधिकार असल्याचे स्पष्ट केले आहे.
- राज्य निवडणूक आयोगाचा दर्जा, शक्ती व अधिकारांसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने १९ ऑक्टोबर २००६ रोजी किशनसिंग तोमर विरुद्ध अहमदाबाद शहर महानगरपालिका आणि इतर या प्रकरणात एक महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. त्यातील ठळक मुद्दे खालीलप्रमाणे :

## सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर एक नजर

- राज्य निवडणूक आयोग शासनापेक्षा स्वतंत्र आहे.
- राज्य निवडणूक आयोगाचा दर्जा भारत निवडणूक आयोगाच्या दर्जाशी समतुल्य आहे.
- राज्य निवडणूक आयोगाला आपली जबाबदारी पार पाडण्यासाठी आवश्यक ती सर्व साधनसामग्री व मनुष्यबळ राज्य शासनाने उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.
- आयोगाचे निर्देश पाळणे राज्य शासनास बंधनकारक आहे.
- आवश्यकता भासल्यास राज्य निवडणूक आयोग राज्य शासनाच्या विरोधात 'रिट ऑफ मँडमस'द्वारे न्यायालयात दाद मागू शकतो.



# राज्य निवडणूक आयुक्त

- राज्य निवडणूक आयुक्तांच्या नेतृत्वाखाली राज्य निवडणूक आयोगाचे कामकाज चालते. शासनाचे प्रधान सचिव किंवा त्यापेक्षा अधिक दर्जाचे पद धारण केलेल्या व्यक्तीची राज्य निवडणूक आयुक्तपदी पाच वर्षांसाठी राज्यपालांकडून नियुक्ती केली जाते.
- महाराष्ट्राचे पहिले राज्य निवडणूक आयुक्त म्हणून श्री. दे. ना. चौधरी यांची नियुक्ती झाली होती. सध्या श्री. ज. स. सहारिया पाचवे राज्य निवडणूक आयुक्त म्हणून कार्यरत आहेत. एक संविधानात्मक संस्था म्हणून राज्य निवडणूक आयोगाला नावारुपाला आणण्याच्या कामात आतापर्यंतच्या सर्व राज्य निवडणूक आयुक्तांनी आपापल्या परीने योगदान दिले आहे.
- श्री. ज. स. सहारिया यांनी ५ सप्टेंबर २०१४ रोजी राज्य निवडणूक आयुक्तपदाचा कार्यभार स्वीकारला आहे. तत्पूर्वी, त्यांनी राज्याचे मुख्य सचिव आणि महाराष्ट्र व दिल्लीत विविध महत्त्वाच्या पदांची धुरा सांभाळली आहे. त्यांनी अलाहाबाद विद्यापीठातून एम.एससी.; तर अहमदाबादच्या आय.आय.एम.मधून एम.बी.ए. केले आहे.

## राज्य निवडणूक आयुक्त व त्यांचा कार्यकाल


**श्री. दे. ना. चौधरी**
२६ एप्रिल १९९४ ते २५ एप्रिल १९९९

**श्री. य. ल. राजवाडे**
१५ जून १९९९ ते १४ जून २००४

**श्री. नंदलाल**
१५ जून २००४ ते १४ जून २००९

**श्रीमती नीला सत्यनारायण**
६ जुलै २००९ ते ५ जुलै २०१४

**श्री. ज. स. सहारिया**
५ सप्टेंबर २०१४ पासून




# स्थानिक स्वराज्य संस्था

- केंद्र शासन, राज्य शासन व स्थानिक स्वराज्य संस्था ही व्यवस्था म्हणजेच लोकशाहीची त्रिस्तरीय रचना म्हणावी लागेल. यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका राज्य निवडणूक आयोगातर्फे घेतल्या जातात.
- राज्यात एकूण २८ हजार ५३२ स्थानिक स्वराज्य संस्था आहेत. त्यात २६ महानगरपालिका, २३० नगरपरिषदा, ११० नगरपंचायती, ३४ जिल्हा परिषदा, ३५१ पंचायत समित्या व सुमारे २७ हजार ७८१ ग्रामपंचायतींचा समावेश आहे. या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी लोकसभा व विधानसभा निवडणुकांकरिता असलेला 'लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० व १९५१' प्रमाणे एक स्वतंत्र कायदा नाही. वेगवगळ्या पाच कायद्यान्वये राज्य निवडणूक आयोगाकडून त्यांच्या निवडणुका घेतल्या जातात.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भातील कायदे


- मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८
- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९
- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५
- महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६२
- महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८




# निवडणूक रणधुमाळी- २०१५

- सन २०१५मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची चांगलीच रणधुमाळी होती. राज्यातील एकूण ग्रामपंचायतींपैकी जवळपास ५० टक्के म्हणजे सुमारे १५ हजार ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका डिसेंबर-२०१५ अखेर पार पडल्या.
- औरंगाबाद व नवी मुंबई महानगरपालिका; तसेच सात नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणुका २२ एप्रिल २०१५ रोजी घेण्यात आल्या. १४ जून २०१५ रोजी वसई-विरार महानगरपालिकेची निवडणूक झाली. कल्याण-डोंबिवली आणि कोल्हापूर महानगरपालिकेचीही निवडणूक १ नोव्हेंबर २०१५ रोजी घेण्यात आली आहे.
- पालघर जिल्हा परिषद व त्याअंतर्गतच्या पंचायत समित्यांसाठी २८ जानेवारी २०१५ रोजी मतदान घेण्यात आले. गोंदिया जिल्हा परिषद व त्याअंतर्गतच्या पंचायत समित्यांसाठी ३० जून २०१५ रोजी मतदान झाले. भंडारा जिल्हा परिषद व त्याअंतर्गतच्या पंचायत समित्यांसाठी ४ जुलै २०१५ ला मतदान झाले.
- नवनिर्मित ३ नगरपरिषदा व ६८ नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी नोव्हेंबर २०१५ मध्ये मतदान घेण्यात आले. या वर्षात एकूण ८० नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या निवडणुका पार पडल्या.

**२०१५ मध्ये झालेल्या महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकांतील पक्षीय बलाबल**




## सन २०१५ मध्ये झालेल्या ८० नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या निवडणुकांमधील पक्षीय बलाबल





एकूण जागा १४५८

## सन २०१५ मध्ये झालेल्या जिल्हा परिषद निवडणुकांतील पक्षीय बलाबल




## सन २०१५ मध्ये झालेल्या २६ पंचायत समित्यांच्या निवडणुकांमधील पक्षीय बलाबल : एकूण जागा ३४४



# वाटचाल आधुनिक तंत्रज्ञानाकडे!

- अधिकाधिक पारदर्शकता आणण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेचे संपूर्ण संगणकीकरण आणि आधुनिकीकरण करण्याचा निर्णय राज्य निवडणूक आयोगाने घेतला आहे. प्रभाग रचना आणि प्रभागनिहाय मतदार यादी तयार करण्यासाठी संगणक प्रणालीचा अवलंब करण्यास सुरवात केली आहे. वेगवेगळे मोबाईल ॲप्सही विकसित केले जात आहेत.
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुकांसाठी नामनिर्देशनपत्रातील माहिती संकेतस्थळावर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने http://panchayatelection.maharashtra.gov.in हे स्वतंत्र संकेतस्थळ विकसित केले आहे.
- ई-सीपी ॲप नावाचे मोबाईल अप्लिकेशन विकसित केले जात आहे. या ॲपच्या माध्यमातून सर्व मतदार आपल्या प्रभागातील निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांचा तपशील जाणून घेऊ शकतील. त्यात संपत्ती, गुन्हेगारी पार्श्वभूमी, शैक्षणिक अर्हता इ. माहितीचा समावेश असेल.

## दुर्गम भागातही क्लिक... क्लिक...

- भंडारा आणि गोंदिया जिल्हा परिषद व त्याअंतर्गतच्या पंचायत समित्यांच्या निवडणुकांमध्ये देखील नामनिर्देशनपत्रे संकेतस्थळावर भरण्याची सुविधा होती. दुर्गम भाग असूनही या जिल्ह्यांमध्ये नामनिर्देशनपत्रे संकेतस्थळावर भरण्यास उत्तम प्रतिसाद लाभला आहे. इथल्या निवडणूक प्रक्रियेतही संगणकाच्या माऊसची क्लिक... क्लिक... अनुभवास आली.

## संकेतस्थळाद्वारे प्राप्त नामनिर्देशनपत्रांचा तपशील

| जिल्हा परिषद/पंचायत समिती | एकूण जागा | एकूण नामनिर्देशनपत्रे | संकेतस्थळाद्वारे प्राप्त |
|---|---|---|---|
| गोंदिया जिल्हा परिषद | ५३ | ४५७ | ३३० |
| गोंदिया जिल्ह्यातील पंचायत समित्या (८) | १०६ | ६५३ | ४४५ |
| भंडारा जिल्हा परिषद | ५२ | ५३५ | ५३४ |
| भंडारा जिल्ह्यातील पंचायत समित्या (७) | १०४ | ७६६ | ७५६ |



# तुमच्या प्रश्नाला क्षणात उत्तर

- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसदर्भात वारंवार विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची (Frequently -Asked Questions) उत्तरे असणाऱ्या पुस्तकांचे मा. राज्यपाल श्री. सी. विद्यासागर राव यांच्या हस्ते १ जुलै २०१५ रोजी प्रकाशन करण्यात आले.
- महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका (ग्रामपंचायती, जिल्हा परिषदा/ पंचायत समित्या, नगरपरिषदा/ नगरपंचायती व महानगरपालिका) ५ वेगवेगळ्या कायद्यांनुसार घेण्यात येतात आणि त्यातल्या निवडणूकविषयक तरतुदींमध्येही बरीच भिन्नता आहे. त्यामुळे या निवडणुकांशी निगडित अधिकारी/ कर्मचारी, राजकीय पक्ष, उमेदवार, मतदार, इत्यादींच्या मनात सातत्याने वेगवेगळे प्रश्न उपस्थित होतात व ते वारंवार विचारले जातात. या प्रश्नांची उत्तरे सहज व सोप्या भाषेत मिळावी, या उद्देशाने आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय एफ. ए. क्यू.ची चार पुस्तके प्रकाशित केली आहेत.
- एफ. ए. क्यू. साठी महाराष्ट्राचे तत्कालीन नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक आणि पंतप्रधान कार्यालयात सध्या उपसचिव पदावर कार्यरत असलेले डॉ. श्रीकर परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली होती. ही पुस्तके सर्व निवडणूक अधिकारी, कर्मचारी, राजकीय पक्ष, उमेदवार, मतदार, अभ्यासक, प्रसारमाध्यमे इत्यादींसाठी उपयुक्त ठरू शकतील.
- एफ. ए. क्यू. ची चारही पुस्तके राज्य निवडणूक आयोगाच्या http://mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर पीडीएफ व ई-बुकच्या स्वरुपात मोफत उपलब्ध आहेत.
- एफ. ए. क्यू. ॲपही विकसित केले जात आहे. त्यामुळे कुणालाही कुठेही आपल्या मोबाईलवरून सुलभरीत्या निवडणूकविषयक प्रश्न आणि शंकांचे निरसन करता येईल.



**“ देशात प्रथमच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात वारंवार विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांचे (एफ. ए. क्यू.) व त्यांच्या उत्तरांची पुस्तके प्रकाशित करण्याचा राज्य निवडणूक आयोगाचा उपक्रम अत्यंत कौतुकास्पद आहे.**

**– श्री. सी. विद्यासागर राव**

मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य

मुंबई येथील राजभवनात एफएक्यू पुस्तकाचे प्रकाशन करताना मा. राज्यपाल श्री. सी. विद्यासागर राव. शेजारी राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया. (१ जुलै २०१५)

# सुसज्ज, प्रसन्न कार्यालय

- नवीन प्रशासकीय इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील राज्य निवडणूक आयोगाच्या नूतनीकृत कार्यालयाचे मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते २४ सप्टेंबर २०१५ रोजी उद्घाटन करण्यात आले.
- नूतनीकरणाच्या माध्यमातून कार्यालयाची सुटसुटीत रचना करण्यात आली आहे. निवडणुकांसंदर्भात वारंवार वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठका होतात. त्यासाठी स्वतंत्र समिती कक्ष तयार करण्यात आला आहे. शिवाय क्षेत्रीय अधिकाऱ्यांशी संवाद साधण्यासाठी व्हिडिओ कॉन्फरन्सची देखील या कक्षात सुविधा आहे.

> **स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका म्हणजे लोकशाही व्यवस्थेचा पाया आहे. हा पाया मजबूत करण्याचे काम राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने केले जात आहे.**
>
> **श्री. देवेंद्र फडणवीस,**
> मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य





राज्य निवडणूक आयोगाच्या नूतणीकृत कार्यालयाचे उद्घाटन करताना मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस. शेजारी मा. राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया, आयोगाचे सचिव डॉ. प्रदीप व्यास. दुसऱ्या छायाचित्रात मा. मुख्यमंत्री व मा. आयुक्त यांच्या सोबत राज्य निवडणूक कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी. (२४ सप्टेंबर २०१५)

# ...तर पक्ष नोंदणी रद्द

- राज्य निवडणूक आयोगाकडे १ सप्टेंबर २०१५ अखेर ६ राष्ट्रीय पक्ष, २ राज्यस्तरीय पक्ष, इतर राज्यांतील ९ राज्यस्तरीय पक्ष व ३४० अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांची नोंदणी करण्यात आली आहे.
- राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांना नियमितपणे आयकर विवरणपत्र भरल्याची (रिटर्न्स) आणि लेखापरीक्षित लेख्याची (ऑडिट) प्रत आयोगाकडे सादर करणे आवश्यक असते. या कागदपत्रांची पूर्तता न करणाऱ्या राजकीय पक्षांना राज्य निवडणूक आयोगाने नोटीस बजावल्या आहेत.
- आयोगाकडे २००५ मध्ये नोंदणी झालेल्या १९ राजकीय पक्षांना पहिल्या टप्प्यात ४ जून २०१५ मध्ये नोटीस बजावण्यात आल्या होत्या. त्यापैकी केवळ तीन पक्षांनी कागदपत्रांची पूर्तता केली. सहा पक्षांच्या पत्त्यांवर नोटीसचा बटवडा झाला नाही. सहा पक्षांनी कुठलाही प्रतिसाद दिला नाही; तर चार पक्षांनी दोन महिन्यांची मुदतवाढ मागितली होती. या चार पक्षांनी मुदतवाढ देऊनही कागदपत्रांची पूर्तता केली नाही. त्यामुळे त्यांच्यासह एकूण सोळा पक्षांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे. मात्र संबंधित चार पक्षांनी पुन्हा मुदतवाढ मागितली. त्यामुळे त्यांना एक लाख रुपये दंड आकारून ३० डिसेंबर २०१५पर्यंत कागदपत्रे सादर करण्यासाठी मुदतवाढ दिली होती. त्यानंतरही कागदपत्रे सादर न केल्यास त्यांची नोंदणी मात्र आपोआप रद्द होणार आहे.
- कागदपत्रांची पूर्तता न करणाऱ्या अमान्यताप्राप्त नोंदणीकृत २८० राजकीय पक्षांना दुसऱ्या टप्प्यात १७ नोव्हेंबर २०१५ मध्ये आयोगाने नोटीस बजावल्या. या पक्षांनी ३० डिसेंबर २०१५ पर्यंत संबंधित कागदपत्रांती पूर्तता न केल्यास राज्य निवडणूक आयोगाकडून त्यांची नोंदणी रद्द केली जाणार असल्याचे नोटीसमध्ये नमूद केले आहे.



राजकीय पक्षांना आयोगाचा दणका

कागदपत्रांची पूर्तता न केल्यास नोंदणी रद्दचा इशारा; पक्षांना बजावल्या नोटिसा

सकाळ न्यूज नेटवर्क

जिल्हानिहाय पक्षाची नोंद

२८० पक्ष अडचणीत

राज्य निवडणूक आयोगाच्या नोटिसा; ३० डिसेंबरपर्यंत कागदपत्रे देण्याचे आदेश

दुसऱ्या टप्प्यात नोटीस बजावलेले पक्ष

# मतदार व्हा, मतदान करा!

- भारत निवडणूक आयोगातर्फे तयार केली जाणारी विधानसभा मतदारसंघाचीच मतदार यादी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी वापरली जाते. याची नागरिक आणि मतदारांना माहिती करून देण्यासाठी; तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत कुणीही मतदानापासून वंचित राहू नये, यासाठी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्तरावर मतदार जागृती अभियान हाती घेण्यात आले होते.
- विधानसभा मतदारसंघाच्या मतदार याद्या अद्ययावत करण्यासाठी भारत निवडणूक आयोगातर्फे ८ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर २०१५ या कालावधीत मतदार याद्यांचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम राबविण्यात आला होता. त्यातून अद्ययावत होणारी मतदार यादी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांसाठी वापरली जाणार आहे.
- या विशेष संक्षिप्त पुनर्निरीक्षण कार्यक्रमाद्वारे १ जानेवारी २०१६ मध्ये वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या नागरिकास मतदार म्हणून नाव नोंदविण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यात आली होती. त्याचबरोबर नावांत किंवा पत्त्यांत बदल अथवा मृत व्यक्ती व दुबार नावेदेखील वगळण्याची संधी होती.
- भारत निवडणूक आयोगाच्या या कार्यक्रमाचे औचित्य साधून राज्य निवडणूक आयोगाने संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रांत त्या त्या संस्थांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात मतदार जागृतीचा कार्यक्रम हाती घेतला होता. वृत्तपत्रे, स्थानिक केबल टीव्ही, रेडिओ, होर्डिंग, एस.एम.एस., बस, ट्रेन आदी माध्यमातून मतदारांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केला. या मोहिमेची फलश्रुती म्हणजे मतदार म्हणून नाव नोंदविणाऱ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ दिसून आली.
- भारत निवडणूक आयोग, राज्य निवडणूक आयोग आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी एकत्रितपणे मतदार नोंदणीसाठी मोहीम राबविण्याची ही पहिलीच वेळ होती. त्या निमित्ताने एक नवीन पाऊल उचलले गेले आहे.



**भारत निवडणूक आयोगातर्फे राबविण्यात येणाऱ्या मतदार याद्यांचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांसंदर्भात पुणे येथे आयोजित राजकीय पक्षांच्या बैठकीत बोलताना मा. राज्य निवडणूक आयुक्त श्री. ज. स. सहारिया. शेजारी मुख्य निवडणूक अधिकारी श्री. नितीन गद्रे यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी. (३ऑक्टोबर २०१५)**




स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांसाठी ८ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर २०१५ या कालावधीत राबविण्यात आलेल्या मतदार जागृतीची ही काही प्रतिनिधिक छायाचित्रे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा वर्षनिहाय तपशील

| स्थानिक स्वराज्य संस्था | २०१५ | २०१६ | २०१७ | २०१८ | २०१९ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| महानगरपालिका | ५ | -- | १७ | ४ | --- | २६ |
| नगरपरिषदा/ नगरपंचायती | ८० | २२९ | ११ | ११ | ९ | ३४० |
| जिल्हा परिषदा | ४ | --- | २६ | ४ | --- | ३४ |
| पंचायत समित्या | २८ | --- | २९७ | २३ | ३ | ३५१ |
| ग्रामपंचायती | १४,३७४ | १,७५३ | ७,८६६ | २,२१७ | १,५७१ | २७,७८१ |
| **एकूण** | **१४,४९१** | **१,९८२** | **८,२१७** | **२,२५९** | **१,५८३** | **२८,५३२** |

# सेतू सुसंवादाचा!

- राज्य निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी मतदार यादीचा कार्यक्रम, निवडणूक कार्यक्रम, परिपत्रके, आदेश निर्गमित केले जातात. बैठका, कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. याची माहिती सर्वसामान्य नागरिक, मतदार, राजकीय पक्ष, उमेदवार आदींना होणे आवश्यक असते. त्यासाठी प्रसारमाध्यमांशी समन्वय साधून या सर्व घटना घडामोडींना व्यापक प्रसिद्धी देण्याचा प्रयत्न केला जातो. वेळोवेळी पत्रकार परिषदाही घेतल्या जातात.
- क्षेत्रीय स्तरावरील अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी, त्यांच्या अडीअडचणी समजून घेण्यासाठी व निवडणूक प्रक्रियेचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी मा. राज्य निवडणूक आयुक्त स्वत: निवडणूक होत असलेल्या संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रात जाऊन वेळोवेळी आढावा घेतात. त्याचबरोबर व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे देखील नियमितपणे निवडणूक अधिकारी, कर्मचाऱ्यांशी संवाद साधला जातो.
- निवडणूक प्रक्रियेशी संबंधित सर्व घटकांशी समन्वय साधण्याचे सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. त्यात मुख्य निवडणूक अधिकारी, राजकीय पक्ष, स्वयंसेवी संस्था, महाविद्यालये, विद्यापीठे, उद्योग जगत आदींचा समावेश आहे.
- निवडणूकविषयक सुधारणांबाबत आणि आयोगाच्या कामकाजाबाबत मा. राज्यपाल महोदयांना अवगत करण्यासाठी बैठक घेण्यात आली. त्याचबरोबर प्रशासकीय बाबी व इतर मुद्यांसंदर्भात मा. मुख्यमंत्री व संबंधित विभागांच्या सचिवांशीही वेळोवेळी बैठका घेऊन अडचणी सोडविण्यावर आयोगाने भर दिला आहे.
- भारत निवडणूक आयोग आणि 'यू.एन.डी.पी.'सारख्या संस्थांशी संवाद साधून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेत अधिकाधिक सुधारणा करण्यासाठी आयोग प्रयत्नशील आहे.
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये अधिकाधिक पारदर्शकता आणण्यासाठी आणि आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी निवडणूक निरीक्षकांची नियुक्ती करण्याचा निर्णय राज्य निवडणूक आयोगाने घेतला आहे.



विविध आंतरराष्ट्रीय संस्थांशी संवाद प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नांचा भाग म्हणून मा. राज्य निवडणूक आयुक्त श्री. ज. स. सहारिया यांनी घेतलेल्या बैठकीस उपस्थित आयोगाचे सचिव डॉ. प्रदीप व्यास, यूएनडीपीचे कंट्री डायरेक्टर जॅको सिलिअर्स, प्रकल्प व्यवस्थापक जॉन बोर्गोयारी आदी.
(२१ नोव्हेंबर २०१५)

## स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय जागा व आरक्षणाचा तपशील

| स्थनिक स्वराज्य संस्था | | महानगरपालिका | नगरपरिषदा | नगरपंचायती | जिल्हापरिषदा | पंचायत समित्या | ग्रामपंचायती | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण | | २६ | २३० | ११० | ३४ | ३५१ | २७७८१ | २८५३२ |
| एकूण जागा | | २६२४ | ५०२३ | १८७० | २००६ | ४०१२ | २२२७९५ | २३८३३० |
| महिला राखीव | | १३१८ | २५९५ | ९९० | १०१३ | २००६ | १११६९१ | ११९६१३ |
| सर्वसाधारण | एकूण | १५७५ | २८२६ | ८७९ | ९४९ | १९५४ | १०९६१५ | ११७७९८ |
| | महिला | ७७८ | १३६७ | ४२३ | ४६४ | ८५२ | ५४९१६ | ५८८०० |
| अनुसूचित जाती | एकूण | २६८ | ५८० | २३१ | २२६ | ४४९ | २५६८३ | २७४३७ |
| | महिला | १४० | ३१८ | १२५ | १२२ | २४३ | १२९१० | १३८५८ |
| अनुसूचित जमाती | एकूण | ७१ | २२२ | २११ | २९३ | ५७४ | २७२७० | २८६४१ |
| | महिला | ३८ | १२६ | ११३ | १५२ | ३१२ | १३६५७ | १४३९८ |
| नागरिकांचा मागास प्रवर्ग | एकूण | ७१० | १३९५ | ५४९ | ५३८ | १०३५ | ६०२२७ | ६४४५४ |
| | महिला | ३६२ | ७८४ | ३२९ | २७५ | ५९९ | ३०२०७ | ३२५५६ |







**राज्य निवडणूक आयोग**

पहिला माळा, नवीन प्रशासकीय भवन,

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,

मुंबई– ४०००३२.

दूरध्वनी– ०२२ २२०४६९०९

ई–मेल – stateelectioncommission@gmail.com, sec.mh@gov.in

संकेतस्थळ– https://mahasec.maharashtra.gov.in